**संक्षिप्त फौजदारी खटला कमांक १७४/२०२२**
**निशाणी क.७३ पुढे सुरू**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क. ०२ –</u>**

मी याद्वारे शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव :– अजय अशोक गट्टाणी,**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी.जी. नावंदर यांचेमार्फत :–</u>**

**०२.** मी औसा येथे रूजु होण्यापुर्वी चाकुर शाखेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ७३ वरील कागदपत्रे हे फिर्यादीने प्रकरणासोबत दाखल केले आहे.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने माझ्या शाखेत खाते उघडले तेव्हा मी तेथे कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, बॅंकेचे खातेचे वेगवेगळे प्रकार असतात. फिर्यादीचे खाते हे सेव्हींग स्वरूपाचे आहे. फिर्यादीच्या खाते काढल्यापासुनचे तपशिल बॅंकेमध्ये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक ०८/०४/२००४ पासुनचे फिर्यादीचे खाते तपशिल आणले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, खातेदाराने कोणती कर्जे घेतली आहेत हे पुर्ण तपशिल पाहील्यावरच समजते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे खाते सद्यस्थितीत चालु स्वरूपात आहे. फिर्यादीच्या खात्याचे सर्व तपशिल दाखल करता येवु शकतात.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे संपुर्ण खात्याचे तपशिल पाहील्याशिवाय त्याचे जमा व खर्च किती झाला हे पाहता येत नाही.

**(आरोपी वकीलांच्या विनंतीवरून उलटतपास मध्यावधीपर्यंत तहकुब.)**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.07.15 16:35:26 +0530

**दि. १५/०७/२०२६**

**(श्री. आवटे पी. पी.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा**

(मध्यावधीनंतर उर्वरीत उलटतपास पुढे सुरू)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १७४/२०२२**
**निशाणी क्र.७३ पुढे सुरू**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ –**

मी याद्वारे शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव :– अजय अशोक गट्टाणी,**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी.जी. नावंदर यांचेमार्फत :–**

**०५.** मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मी निर्देशाप्रमाणे फिर्यादीचे बॅंकेचा तपशिल अभिलेखावर दाखल केले आहेत. आता मला फिर्यादीच्या खात्याचे दिनांक ०१/०३/२०१९ ते दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंतचे तपशिल दाखविण्यात आले. ते मी दाखल केले आहेत. त्यावर बॅंकेचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास एकत्रितपणे **निशाणी ८७** देण्यात आला.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.07.15 16:35:31 +0530

**दि. १५/०७/२०२६**

**(श्री. आवटे पी. पी.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा**